

# पुस्तकासाठी फीत तयार करा

हा तुमचा पहिला प्रॉजेक्ट आहे. ह्या वीडियो मध्ये तुम्ही शिकणार आहेत की बुकमार्क कसा बनवायचा. हे अगदी सोपे असले पाहिजे कारण तुम्ही शिवन कामाचे धडे आधीच घेतलेले आहेत.



सुरू करताना आपल्याला लागणार आहे:
-आठ बाय दोन इंचाचे कपडाचे दोन तुकडे
-सहा बाय दोन इंचाचा कपडाचा एक तुकडा
-चार बाइ दोन इंचाचा फेल्ट चा तुकडा
या अखेरीस तुमच्याकडे एक रेश्माचा गुच्छ असावा, घरी बनवलेला किंवा दुकानातून आणलेला.



आता सर्व तुकड्यांच्या काठा पिंकिंग शेअर्स च्या मदतीने कापा म्हणजे ज़िग ज़ॅग काठ तयार होईल, यानी ती झीझत नाही.

आता दोन मोठे तुकडे घ्या आणि त्यांची उलटी बाजू समोरासमोर येईल अशी जोडा. दोन छोटे तुकडे या मोठ्या तुकड्यांवर सुलटे बरोबर ठेवा.

बीडीत पिणांनी सर्व तुकडे नीट जोडुन घ्या. टॅसलला वरच्या दोन पदरा भवती मध्ये ठेवा. आणि पीण लावून घ्या.




ही सगळी तयारी झाल्यानंतर तुम्ही बुकमार्क शिवायला तयार आहात.

कापड फुट खाली ठेवा म्हणजे काठ बरोबर फुट खाली येईल आणि प्रेसर फुट खाली करा. स्टिच पॅटर्न कडे बघा आणि एक निवडा.

येथे आपण पॅटर्न डी सेलेक्ट केला आहे , पॅटर्न सेलेक्टर नॉब ला डी वर ठेवा. स्टिच लाईन सेलेक्टर डाइयल ला एस एस मोड वर ठेवा म्हणजे तुम्ही तुमची डेकोरेटिव स्टिच निवडू शकाल. आता तुम्ही कापड शिवायला तयार आहात.



सुरुवातीला सावकाश पने शिवा आणि हळूहळू वेग वाढवा. लक्षात घ्या की कापड प्रेसर फुट बरोबर संरेखित आहे आणि स्विंग मशीन पॅटर्न बरोबर पाडतीये. पिणांकडे आल्यावर त्यांना काढायचा विसरू नका, कपडाच्या खाली पर्यंत पोहोचल्यावर सुई न उचलता फक्त प्रेसर फुट उचला आणि अलगद कापड फिरवून खालच्या भागाला संरेखित करा. हे झाल्यावर तिन्ही बाजू शिवून टाका. वरच्या बाजूला पोहोचल्यावर टॅसल वाली पीन काढून टाका. टॅसल हलू नये याची काळजी घ्या आणि तोपर्यंत शिवत जा, जोपर्यंत तुम्ही बुकमार्कच्या सर्व बाजू शिवून काढल्या नाहीत.



बुकमार्क काढून चारी बाजुंचे एक्सट्रा धागे कापून टाका. आता तुमचे बुकमार्क तयार झाले आहे. स्टिच पॅटर्न बघाल तर तुमच्या लक्षात येईल की हा डिज़ाइनचाच एक भाग आहे. आपल्या कल्पनेंन वेगवेगळ बुकमार्कस बनवा. इतर कापड आणि मेटीरियल्स सह एक्सपेरिमेंट करा. आपल्या सृजंशीलतेला अवकाश द्या आणि प्रत्येक बुकमार्कला तुमच्या प्रमाणे अप्रतिम आणि उत्तम भेट वस्तू बनवा.